नमस्कार,

श्रीगुरुचरित्रातील ओव्यांचा योग्य अर्थ प्रयत्न :-

वाचकांनी समर्पक मते कारणमीमांसेसहित

pratisaadasg@gmail.com वर

आपल्या नाव,पत्त्यासहीत कळवावीत ही विनंती.

कळावे,

'श्रीगुरुचरित्र आशय – निधी'

**ओवी क्रमांक :** ३५, ४५, ५२, ६७, ७१

# ओवी क्रमांक ३५

चंद्रभागा रेवतीसी। शरयू नदी गोमतीसी।
वेदिका नदी कौशिकेसी। नित्यजला मंदाकिनी॥ ३५॥

## गद्यरुप :-

चंद्रभागा नदीची तुलना फक्त रेवतीशी (बलरामाच्या पत्नीशी) होऊ शकते. शरयू नदीचे वर्णन सन्मानित नदीचे आहे. उंच आसन (उच्चासन) असलेल्या नदीचे वर्णन कौशिका नदीचे आहे. सदैव पाणी असणारी नदी मंदाकिनी आहे.

## शब्दार्थ :-

| |
|---|
| नित्यजल= नित्य (नेहमी) + जल (पाणी) |

चंद्रभागा नदीची तुलना फक्त रेवतीशी (बलरामाची पत्नीशी) होऊ शकते.

भागवत पुराण, विष्णु पुराण व गर्ग संहिता रेवतीच्या आयुष्याची कथा सांगतात.

श्रीकृष्ण बंधु 'बलराम' हा शेष नागाचा अवतार मानलेला आहे. रेवतीला बलरामाशी विवाह करण्यासाठी, २७ युगे वाट पहावी लागली. २७ युगांनंतर रेवता राजाची कन्या रेवती ह्या जन्मात तिचा विवाह (शेष नाग अवतार) बलरामाशी झाला, अशी पुराण कथा आहे.

संदर्भ :https://en.wikipedia.org/wiki/Revati

पंढरपूर येथे वहाणाऱ्या भीमा नदीचा आकार अर्धचंद्रकोरीसारखा आहे. भीमा नदीला पंढरपूर येथे चंद्रभागा नाव आहे .चंद्रभागेच्या समोर विठोबा मंदिर आहे.

रेवतीसारखी पंढरपूर येथील चंद्रभागा नदी जणू युगा नु युगे विठोबाची वाट पहात आहे, अशा अलंकारिक भाषेत

पंढरपूर येथील विठू माऊली मंदिराची माहिती श्रीगुरुचरित्रकार सांगतात.

संदर्भ :https://en.wikipedia.org/wiki/Pandharpur

-------------------------------------------------------------------

## शरयू नदीचे वर्णन सन्मानित नदीचे आहे.

उत्तरप्रदेशातून वहाणाऱ्या शरयू नदीकाठी असलेल्या अयोध्या नगरीत श्रीविष्णु अवतार असलेल्या प्रभू रामचंद्रांचा जन्म झाला. प्रभू रामचंद्रांच्या रुपाने आदर्श पुरुषोत्तम जगाला मिळाला. शरयू नदीकाठी राम प्रभूंचा जन्म झाल्याने, श्रीगुरुचरित्रकार शरयू नदीस सन्मानित नदी म्हणतात.

संदर्भ :https://en.wikipedia.org/wiki/Sarayu

---------------------------------------------------------------------------

## उंच आसन (उच्चासन) असलेल्या नदीचे वर्णन कौशिका नदीचे आहे.

ऋग्वेदामध्ये कोशी नदीला कौशिका म्हटलेले आहे. कौशिका नदीतीरावर कुशिका वंशातील विश्वामित्र ऋषींनी

ऋग्वेदातील मंडल ३, तसेच गायत्री मंत्र यांची रचना केली. गायत्री मंत्राचा उल्लेख मनुस्मृती, हरिवंश अशा महान ग्रंथांत आहे.

अशा ह्या महान निर्मितीमुळे विश्वामित्र ऋषी वेदिक ऋषी म्हणून मान्यताप्राप्त झाले. विश्वामित्र ऋषींचे आसन असलेल्या कौशिका (अर्वाचीन नाव कोशी) नदीस श्रीगुरुचरित्रकार वेदिका म्हणजे उच्च आसन असे गौरवतात.

संदर्भ :https://en.wikipedia.org/wiki/Koshi_River

---

## सदैव पाणी असणारी नदी मंदाकिनी :-

मंदाकिनी नदी शब्दाचा अर्थ आहे संथ वहाणारी नदी. मंदाकिनी नदी गढवाल येथील हिमालय पर्वत रांगातील केदारनाथ जवळील चोराबारी हिमनदीतून उगम पावते. ह्या नदीची वासुकी गंगा ही (हिमनदी) उपनदी आहे. मंदाकिनी नदी, रुद्र प्रयाग येथे अलकनंदा नदीत संगमित होते.

ऑक्टोबर ते एप्रिल ह्या कालावधीत मंदाकिनी नदीत पाण्याची पातळी कमी असते.

जुन ते सप्टेंबर ही नदी तिच्या रौद्ररुपाचे दर्शन घडविते. जुन २०१० साली मंदाकिनी नदीच्या दोन प्रवाहांमध्ये असलेले केदारनाथ मंदिर सुरक्षित होते, परंतु मंदाकिनी नदीच्या पात्रातील २१व्या शतकातील सिमेंटची जंगले पत्त्यासारखी वाहून गेली होती. पुराचे पाणी वाहून जाणाऱ्या प्रवाहात प्राचीन काळात (पावसाळ्या व्यतिरिक्त) तेथील रहिवासी शेती करीत असत. २१व्या शतकातील भारतीयांनी, मंदाकिनी नदीच्या पात्रात केलेले अतिक्रमण ह्या नदीने उध्वस्त केले.

ऑक्टोबर ते एप्रिल संथ वहाणारी मंदाकिनी नदी, नेहमी पाण्याने भरलेली (नित्य जला) नदी आहे हे लक्षात असू द्या, अशी धोक्याची सुचना ४५० वर्षांपूर्वी श्रीगुरुचरित्रकार देतात.

---

## ओवी क्रमांक ४५

गोदावरीतटाकेसी। योजनें सहा परियेसीं।
तेथील महिमा आहे ऐसी। वाजपेय तितुकें पुण्य॥४५॥

**गद्यरुप :-**

गोदावरी नदी किनाऱ्याने सहा योजने (६ x ४ कोस=२४ कोस) इतके अंतर यात्रा केली तर असे ऐकलेले आहे की, तेथील थोरवी अशी आहे की, वाजपेय यज्ञा इतके पुण्य मिळते.

**शब्दार्थ :-**

| परियसणे= ऐकणे |
|---|

वाजपेय नावाचा यज्ञ असल्याने, वाजपेय यज्ञ केल्याचे पुण्य मिळते, असा अर्थ होतो.

किंवा

श्रीगुरुचरित्र कारांनी यज्ञ शब्द न वापरल्याने,

## वाज म्हणजे  बोलणे

बोलाल तितके पुण्य-पेय मिळेल, असाही अर्थ असावा.

गोदावरी नदीचा उगम ते संगम मार्ग पुढिलप्रमाणे आहे. ब्रह्मगिरी पर्वत, नाशिक येथे उगम पावणारी गोदावरी नदी, रामकुंड येथे दक्षिण वाहिनी नदी होते, म्हणुन हिला दक्षिण वाहिनी गंगा म्हणतात. १४६५ कि. मीटर लांबीची गोदावरी नदी भारतातील दुसऱ्या क्रमांकाची नदी आहे.

भारताच्या पश्चिमेकडील (जिल्हा नाशिक) महाराष्ट्र येथे उगम पावणारी गोदावरी नदी  पूर्वेकडील काकिनाडा, (राज महेंद्री - राजा मुंड्री जवळ) आंध्र प्रदेश   येथे ४ मुखांनी (गोदावरी,गौतमी, नीलावेरु, वशिष्ठ व वैनतेय) बंगालच्या उपसागराला मिळते.

# ओवी क्रमांक ५२

पांडुरंग मातुलिंग। क्षेत्र बरवें पुरी गाणग।
तीर्थें असती तेथें चांग। अष्टतीर्थें मनोहर॥५२॥

## गद्यरुप :-

गाणगापूर येथील संगमेश्वर मंदिरातील कर्पूरगौर(शिवशंकर)च्या अस्तित्वात सृष्टीनिर्मीतीचे अधिकरण असल्याने, गाणग ही नगरी क्षेत्र म्हणून शोभून दिसते. तेथील तीर्थें चांगली असून अष्टतीर्थें मनोहर आहेत.

## शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| पांडुरंग=पांडु (पांढरे)+रंग=पांढऱ्या (गोऱ्या) रंगाचा देव =कर्पूरगौर शिवशंकर<br>संदर्भ:- https://en.wikipedia.org/wiki/Vithoba | | |
| मातुलिंग =प्रकृती आणि पुरुष यांच्या रुपाने प्रजा निर्मिती होते. सृष्टी निर्मितीचे अधिकारण म्हणून मातुलिंगाकडे पाहिले जाते.<br>संदर्भ:http://www.esakal.com/esakal/20101009/5725682635493558687.htm | | |
| बरव= शोभा | पुरी= नगरी | चांग= चांगला |

## गाणगापूरचा पांडूरंग :- कर्पूरगौर शिवशंकर

वरील ओवीमध्ये 'पांडुरंग' ह्या शब्दाचा अर्थ 'शुभ्र रंग' असा होत असल्यामुळे, तो गौरवर्णीय शिवाचा दर्शक असल्याने, शब्दप्रभू श्रीगुरुचरित्रकार गाणगापूरच्या शिवशंकराच्या गौर वर्णाचे वर्णन सांगण्यासाठी 'पांडूरंग' (शूभ्र रंगाचा) हा शब्द वापरतात.

## पंढरपूरचा पांडूरंग :- श्रीविष्णु अवतार (श्रीकृष्ण)

पंढरपूरचा  सावळ्या विठ्ठलाचे वर्णन करताना संत ज्ञानेश्वर आपल्या अभंगात म्हणतात,

"पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती"

पांडूरंगाच्या कांतीचे तेज झळकत होते त्यामुळे रत्नकांतीची प्रभा पसरल्याचा भास होतो

संदर्भ: https://www.youtube.com/watch?v=mHV60y_fhz8

**मराठी संतांनी पंढरपूरच्या पांडूरंगाला विष्णुचा अवतार मानलेले आहे.**

संदर्भ: URL: https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand16/index.php/component/content/article?id=10107

## ओवी क्रमांक ६७

पाताळगंगेचिये स्नानीं। मल्लिकार्जुनदर्शनीं।
षड् गुण फल तयाहूनि। पुनरावृत्ति त्यासी नाहीं॥ ६७॥

**गद्यरुप :-**

मल्लिकार्जुन दर्शनात, पाताळगंगेतील स्नानाने मिळणारे सहापट पुण्य फळ मिळते. पुनः तसे पुण्य घडू शकत नाही.

भावार्थ :-

खंडाळा, महाराष्ट्र येथे उगम पावणारी पाताळगंगा ही नदी ह्या ओवीत अपेक्षित नसावी. पुराणांमध्ये गंगा नदीच्या तीन उपनद्या सांगितलेल्या आहेत १) स्वर्ग गंगा (मंदाकिनी), २) भू गंगा (भागिरथी) ३) पाताळगंगा (भागवती) तसेच भूतलावरील इतर उपनद्या यांच्या संगमातून वहाणारी गंगा नदी, बंगालच्या उपसागराला मिळते. भागवती ह्या पाताळगंगेचे अस्तित्व

महाभारतात अर्जुनाने बाणाच्या सहाय्याने तिचा झरा निर्माण करुन, शरपंजरी असलेल्या भीष्माचार्यांना गंगा जल दिले होते, अशी कथा आहे .

पाताळगंगा ह्या नदीचे अस्तित्व दिसत नसल्याने, तिच्यात स्नान करणे अशक्य आहे. त्यामुळे श्रीशैल्यम येथील मल्लिकार्जुन (मल्लिका=पार्वती +अर्जुन=श्रीशंकराचे नाव) दर्शन घ्यावे, असे श्रीगुरुचरित्रकार सांगत असावेत.

सृष्टिनिर्मितीचे अधिकरण म्हणुन मल्लिकार्जुन लिंगांचे महत्व आहे. सृष्टिनिर्मितीचा पूर्णावतार असलेल्या शिवपार्वती लिंगदर्शनात पाताळगंगेच्या स्नानातील पुण्य मिळते असा ह्या ओवीचा अर्थ असावा.

श्रीशैल्यम येथील मल्लिकार्जुन (मल्लिका=पार्वती +अर्जुन=श्रीशंकराचे नाव) श्रीशंकराचा पूर्णावतार आहे, असे मानतात.

---

# ओवी क्रमांक ७१

शेषाद्रिक्षेत्र श्रीरंगनाथ। पद्मनाभ श्रीमदनंत।

पूजा करोनि जावें त्वरित। त्रिनामल्लक्षेत्रासी॥७१॥

**गद्यरुप :-**

शेषाद्रिक्षेत्र म्हणजे शेषाचलम डोंगररांग असून, येथील श्रीरंगनाथ पद्मनाभ श्रीमदनंत म्हणजे श्री विष्णु होय. (तिरुपती बालाजी मंदीरातील) श्रीविष्णुची पूजा करुन, तीन पात्र असलेल्या नैसर्गिक कमान क्षेत्राशी त्वरित जावे.

**शब्दार्थ :-**

| | |
|---|---|
| श्रीरंग=श्री विष्णु | पद्मनाभ= श्री विष्णु |
| श्रीमदनंत =श्रीमद् (श्री विष्णु) +अनंत (श्रीविष्णु, शेषनाग)<br>श्रीमद् म्हणजे विख्यात, प्रख्यात, कीर्तिशाली. | |
| त्रिनामल्लक्षेत्र=त्रि(तीन) +ना (की) +मल्ल(पात्र)<br>तीन पात्र असलेली ही दगडांची नैसर्गिक कमान तिरुमाला | |

टेकडीच्या उत्तरभागातील सिलाथोरनम ह्या जागी आहे. ह्या कमानीस सर्प आकृती (शेष नाग रुप),शंख तसेच चक्र अशा पवित्र स्वरुपातील श्रीविष्णुचे अस्तित्व मानतात. हे ठिकाण सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत धुक्याने वेढलेला असते . धुक्याच्यावेळी हे निसर्ग सौंदर्य अप्रतिम दिसते; म्हणून पहाण्यास त्वरित जावे, असे श्रीगुरुचरित्रकार सांगत असावेत.

॥ श्रीगुरुदेवदत्त॥